Sheth T.J. Education Society's
**SHETH N.K.T.T COLLEGE OF COMMERCE &**
**SHETH J.T.T COLLEGE OF ARTS,**
**KHARKAR ALLEY, THANE (AUTONOMOUS)**
(Reaccredited by NAAC B++ (2.91), 4th cycle, ISO certified : 9001:2015)

जावक क्र. वासंम/अहवाल/NKTC/LIB/938/24-25

दिनांक ३१-०१-२०२५

प्रति,
माननीय विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग,
पनवेल

**विषय:- वाचन संकल्प महाराष्ट्राचा' संदर्भात अहवाल स्वीकारणेबाबत.....**

संदर्भ:- विससं/उशि/कोविपं/मवि/२०२५/२६६ दिनांक:- ३०-०१-२०२५

माननीय महोदय,

उपरोक्त संदर्भानुसार आम्ही आपणास कळवू ईच्छितो की, शासनाकडून प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार आमच्या महाविद्यालयात " वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

परिपत्रकातील विहित उद्देशानुसार, सूचनेनुसार या उपक्रमांतर्गत वाचनवाढीस पूरक ठरणारे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अधिक वाचानाभिमुख बनवून वाचनसंस्कृती वाढीस हातभार लावण्याचा प्रयत्न संयुक्तरीत्या ग्रंथालय कर्मचारी आणि वाचन संकल्प महाराष्ट्राचा संयोजन समितीने केलेला आहे.

आमच्या महाविद्यालय ग्रंथालयामार्फत पूर्वीपासूनच वाचनसंस्कृती वाढीस पूरक ठरणारे विविध उपक्रम राबविले जात आहेत. सदर उपक्रमाच्या माध्यमातून अधिक नाविन्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविण्याची संधी या उपक्रमाद्वारे प्राप्त झालेली आहे आणि निश्चितच या उपक्रमांद्वारे वाचनसंस्कृतीचा विकास होईल असा सार्थ विश्वास आम्हास वाटतो.

दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी-२०२५ या कालावधीत राबविलेल्या विविध उपक्रमांचा आणि त्यानुसार आयोजित केलेल्या 'पुस्तक परीक्षण स्पर्धेतील विजेत्याना प्रजासत्ताक दिनी आयोजित केलेल्या पारितोषिक वितरण सोहळ्याचा अहवालासह (एकूण १४ पृ.) तीन प्रतीत जावक क्र. वासंम/अहवाल/938 दिनांक 31-०१-२०२५ द्वारे पाठवीत आहोत. त्याचबरोबर सदरचा अहवाल कार्यालयाच्या jtdire.1115@gmail.com या ईमेलवर देखील पाठविलेला आहे.

ग्रंथपाल
श्री. राजेश भालचंद्र लुळे
भ्र-९७६९८९७६१७

प्राचार्य
डॉ. दिलीप एम. पाटील

**Vision : Committed and Persuasive Efforts Towards Holistic Education**

## LEARNING RESOURCE CENTRE [LIBRARY]

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम अहवाल

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०२४ / ई-९०५२२१ / समन्वय दिनांक २० डिसेंबर-२०२४ नुसार शेठ एन. के. टी. टी. महाविद्यालयाने "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" याअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निश्चित केले होते त्यानुषंगाने महाविद्यालयीन पातळीवर "वाचन संकल्प महाराष्ट्राचा संयोजन समिती" खालीलप्रमाणे स्थापन केली होती.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. दिलीप पाटील - प्राचार्य-अध्यक्ष** | **सौ. गीतांजली चिपळूणकर - समन्वयक** | **श्री. राजेश लुळे - ग्रंथपाल- सदस्य** |
| **सौ. दिपाली मुलमुले - सदस्य** | **श्री. शिशिर आंगणे - सदस्य** | **श्री. प्रणव भामरे - सदस्य** |

उपरोक्त समितीने सभा घेवून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने विविध समाविष्ट कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे नियोजन केले होते आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. त्यामध्ये महाविद्यालयात पूर्वीपासून सुरु असणारे वाचनवाढीविषयक विविध उपक्रम (२१ दिवस वाचन संकल्प, उत्कृष्ट वाचक योजना, लेखक तुमच्या भेटीला, जेष्ठ नागरिक घरपोच पुस्तक देवघेव इत्यादी.) सुरु ठेवण्याबरोबरच या पंधरा दिवसाच्या कालावधीत नव्या स्वरूपात राबविण्याबाबत ठरले आणि त्यानुसार सर्व कार्यक्रमांचे नियोजन आणि आयोजन संयोजन समितीने केले होते. त्यामध्ये पुस्तक परीक्षण स्पर्धा, सामुहिक वाचन, ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन, लेखक तुमच्या भेटीला, माझी आई माझ्या महाविद्यालय ग्रंथालयात, वाचन कौशल्य कार्यशाळा, बाह्य सभासद नोंदणी, पुस्तक अदलाबदल योजना, वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट योजना यासारख्या विविध उपक्रम समाविष्ट होते.

## दिननिहाय वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचे / उपक्रमांचे आयोजन: -


- **दिनांक ०१ जानेवारी-२०२५ → उपक्रम उदघाटन सोहळा**


वाचन संस्कृती विकासाच्या दृष्टीने उपरोक्त परिपत्रकानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे समितीने निश्चित केले होते. त्यानुसार या उपक्रमाची सर्व विद्यार्थी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना माहिती होऊन अधिकाधिक व्यक्तींनी सहभाग नोंदवावा यासाठी दिनांक ०१ जानेवारी-२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या डॉ. मानोशी बागची, नॅक संयोजक डॉ. हिमान्शी मनसुखानी, श्री राजेश लुळे ग्रंथपाल, कार्यालय अधीक्षक श्री. नरेंद इंगळे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व ग्रंथालय कर्मचारी वर्गाने योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक सौ. गीतांजली चिपळूणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांनी आपल्या मानवी आयुष्यातील पुस्तकांचे महत्वाचे स्थान सांगितले. त्याचबरोबर पुस्तक हेच आपले निस्वार्थी मित्र असतात त्यासाठी प्रत्येकाने पुस्तक वाचलेच पाहिजे असे त्यांनी सांगितले. या आजच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी आपण सर्वांनी जास्तीत पुस्तक वाचनाचा संकल्प करू असे आवाहन त्यांनी केले.

ग्रंथपाल श्री. राजेश लुळे यांनी ग्रंथालयामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या वाचन वाढीस उपयुक्त असणाऱ्या विविध पूरक उपक्रमांची माहिती याप्रसंगी दिली. वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाचे स्वरूप आणि वेळापत्रकाची माहिती दिली आणि या सर्व उपक्रमात आणि स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा




दि. 01-01-2025






**“पुस्तकानि ज्ञानस्य सागर:, ये पठन्ति ते सुधीरा:”**


**“Books are the ocean of knowledge, those who read them are the wise.”**


**Vision : Committed and Persuasive Efforts Towards Holistic Education**


## • दिनांक ०३ जानेवारी-२०२५ → पुस्तक माझ्या आवडीचे....


“वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या शासनप्रणीत उपक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन करताना दिनांक ०३-०१-२०२५ रोजी विद्यार्थ्यांना ग्रंथालयात येऊन आपल्या आवडीचे पुस्तक निवडून ते किमान एक तास वाचावयाचे असे उद्दिष्ट दिले होते. त्यानुसार ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आमच्या ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला असल्याने विद्यार्थी आपल्याला हवे असणारे पुस्तक सहज शोधू शकतात आणि त्यांना हवे असणारे पुस्तक सहजरीत्या शोधून देण्याचे नेहमीचे काम आमचे कर्मचारी करतच असतात. विद्यार्थ्यांना हवा असणारा लेखक, विषय, वाचनाची गरज यांची माहिती घेऊन हवे ते पुस्तक त्वरित शोधून देण्याचे काम आमचे ग्रंथालय कर्मचारी श्री. मनोहर मरगजे, श्री. महादेव प्रभू आणि श्री. राहुल कढणे, श्री लक्ष्मण कोल्हे, श्री अशोक डाके यांनी यशस्वीपणे केले. या उपक्रमात संयोजन समितीचे सदस्य प्रा. प्रणव भामरे [इंग्रजी विभाग] यांचे देखील मोलाचे मार्गदर्शन सहभागी विद्यार्थ्यांना झाले.

स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावित्रीबाई फुले यांच्याशी निगडित आणि महिला सबलीकरणावर आधारित वाचन साहित्याचे प्रदर्शन ठेवले होते. या कार्यक्रमास शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने आवर्जून भेट दिली.
























- <u>**दिनांक ०४ ते ०६ जानेवारी-२०२५ → माझी आई महाविद्यालय ग्रंथालयात.....**</u>

आईचे संस्कार आयुष्यात खूप महत्त्वाचे असतात. जगात आईच्या संस्काराचे कुठलेही पुस्तक नाही. कारण आईचे संस्कार हे पुस्तकाच्या पलीकडचे असतात. कारण आईचे विचार, तिचे वागणे, बोलणे काळजातून आलेले असते, ही त्रिकालाबाधित सत्य बाब लक्षात घेवून माननीय प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांची कल्पनेतून महाविद्यालयीन ग्रंथालयाने <u>"माझी आई महाविद्यालय ग्रंथालयात'</u> या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी

केली होती. विद्यार्थ्यांना आपल्या आईसाठी ग्रंथालयाचे सभासदत्व घेवून आईला वाचनाचा आनंद देऊ शकतील. त्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचा फायदा निश्चितच आपल्याला आणि पुढील पिढीला होईल या उद्देशाने शनिवार दिनांक ०४ जानेवारी आणि सोमवार दिनांक ०६ जानेवारी-२०२५ रोजी सकाळी ७.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी सोबत आणलेल्या मातांना ग्रंथालयातील पुस्तकांची आणि त्या अनुषंगाने ग्रंथालयाच्या ग्रंथसंपदेची आणि विविध उपक्रमाची माहिती ग्रंथालय कर्मचारी वर्गाने दिली.

- <u>**दिनांक ११ जानेवारी २०२५ → लेखक तुमच्या भेटीला**</u>

**लेखक तुमच्या भेटीला...**

दिनांक:- ११ जानेवारी-२०२५

| Day & Date | Event | Timing | Venue | Resource Person |
|---|---|---|---|---|
| **Saturday, 11th Jan-2025** | Author to your Visit.... लेखक तुमच्या भेटीला... | 11.00AM | Learning Resource Centre [Library] 3rd Floor | डॉ. आदित्य अंकुश देसाई Dr. Aditya Desai प्राध्यापक, लेखक, समीक्षक |











लेखक आपल्या भेटीला उपक्रमा अंतर्गत डॉ. आदित्य देसाई सरांनी मार्गदर्शन करताना खालील बाबींवर विशेष भर दिला

- विद्यार्थ्यांनी केवळ कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून न राहता पुस्तकांच्या वाचनावर भर देण्याविषयी मार्गदर्शन केले.
- येत्या काळात मनुष्यावर दैनंदिन जीवनातील आव्हनांमुळे येणाऱ्या ताणावर उपाय म्हणून पुस्तक

वाचनाचा सल्ला दिला.

- विद्यार्थ्यांना लिहिते होण्याचा कानमंत्र दिला.
- त्याचप्रमाणे ब्लॉग लेखनासारख्या आधुनिक लेखन तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्यामधीलसुप्त लेखन आणि वाचन कौशल्याला मार्ग मोकळा करून दिला पाहिजे आणि कालानुरूप विविध कौशल्य आत्मसात करण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे.
- महाविद्यालय ग्रंथालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबद्दल महाविद्यालय ग्रंथालयाचे विशेष कौतुक केले.



- **<u>दिनांक १३ जानेवारी-२०२५ → ग्रंथदिंडी</u>**

ग्रंथदिंडीचा मुख्य उद्देश वाचन संस्कृतीचा विकास करणे हा आहे. वाचन प्रसार करणे, वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानवृद्धी करणे आणि समाजात वाचन संस्कृती रूजवणे हे या उद्देशाने वाचन संकल्प महाराष्ट्राच या उपक्रमात ग्रंथदिंडीचे आयोजन केले होते. यामध्ये अनेक विद्यार्थी विद्यार्थीनी याबरोबरच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून सुरुवात करून कलेक्टर कार्यालय आणि खारकर गल्ली यामार्गावरून सदर दिंडी काढण्यात आली होती. वाचनविषयक विविध घोषवाक्य आणि विविध ग्रंथ या निमित्ताने प्रदर्शित करण्यात आले होते.



- **<u>दिनांक १४ जानेवारी-२०२५ → वाचन कौशल्य कार्यशाळा:- मार्गदर्शक प्रा. शैलजा सांगळे</u>**

वाचनाची आवड निर्माण होवून ती सातत्याने वृद्धिंगत व्हावी उद्देशाने वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमासाठी माजी प्राचार्य, लेखक, मार्गदर्शक प्रा. शैलजा अरविंद सांगळे (पुणे) यांना आमंत्रित करण्यात आले होते. ग्रंथालयामध्ये स्क्रीनची व्यवस्था करून झूम मिटिंगद्वारे या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वाचनाचे महत्व, पुस्तकांची निवड आणि वाचनविषयक विविध तंत्र आणि मंत्र याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या वाचनविषयक विविध प्रश्नांना उत्तरे देवून अधिकाधिक वाचानाभिमुख होण्याचा सल्ला त्यांनी दिला. सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी वर्गासोबतच संगणक प्रयोगशाळा सहाय्यक श्री. सचिन कारखेले, आणि ध्वनिक्षेपक यंत्रणेसाठी श्री. दता, संतोष परब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



- **<u>दिनांक १५ जानेवारी-२०२५ → सामुहिक वाचन:- मार्गदर्शक:- प्रा. आर. कुमारमंगलम</u>**

मानवी जीवनातील श्रीमद्भगवद्गीता आणि मनाचे श्लोक यांचे अनन्य साधारण असणारे महत्व लक्षात घेऊन संयोजन समितीने उपरोक्त उपक्रम अमंलात आणण्याचे निर्धारित केले. त्यानुसार महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आर. कुमारमंगलम यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमात त्यानी या दोन्ही सर्वोच्च ग्रंथांचे मतितार्थ समजावून सांगितले. ज्या वेळी माणूस संभ्रमात पडतो, तेव्हा काय करावे आणि काय करू नये हें त्याला कळत नाही. अशा विचित्र परिस्थितीत मार्गदर्शन करणारे ग्रंथ आणि या ग्रंथानुसार जीवनात आचरण केल्यास आपले जीवन निश्चितच उन्नत होईल यात शंकाच नाही असा विश्वास उपस्थितांमध्ये निर्माण केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांकडून भगवद्गीतेचे श्लोक आणि मनाचे श्लोक यांचे सामूहिक वाचन करून घेण्यात आले.



- <u>दिनांक १५ जानेवारी-२०२५ → ग्रंथ प्रदर्शन:-विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी कोंकण विभाग ठाणे शाखा</u>

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना विविध ग्रंथांचा परीचय होण्याच्या दृष्टीने आणि विशेष सवलतीत आवडीचा ग्रंथ खरेदी करण्याची संधी प्राप्त व्हावी या उद्देशाने विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी कोंकण विभाग ठाणे शाखा यांच्या सहकार्याने महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन दिनांक ११ जानेवारी आणि १५ जानेवारी-२०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात सर्व विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी उस्फुर्तपणे भेट दिली आणि आवडीच्या ग्रंथखरेदीला प्राधान्य दिले.




सदर उपक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वामी विवेकानंद केंद्राच्या श्री. किशोर महाडिक, वंदना पिंप्रीकर, स्नेहा मुन्डेकर, शीलेश गुप्ता, कीर्ती नरुटे, प्रमोद गुप्ता, ऋषिकेश शिंदे आणि विवेक तिवारी यांनी सहकार्य केले.

- **<u>दिनांक १६ जानेवारी-२०२५ → पुस्तक परीक्षण स्पर्धा आणि पारितोषिक वितरण २६ जानेवारी-२०२५</u>**

दिनांक १६-०१-२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली 'पुस्तक परीक्षण स्पर्धा' या स्पर्धेत एकूण ६५ पेक्षा जास्त स्पर्धकांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला होता यामध्ये विद्यार्थ्यांसोबत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग देखील सहभागी झालेले होते. सदर स्पर्धेसाठी उत्कृष्ट वाचक निवड परीक्षणासाठी महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. जयश्री कुलकणी यांना आमंत्रित केले होते. सदर स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे:-

स्पर्धा गट: विद्यार्थी →

प्रथम पारितोषिक → नेहा पाटील - तृतीय वर्ष कला

द्वितीय पारितोषिक → वैशाली बिष्ट - द्वितीय वर्ष कला

तृतीय पारितोषिक (विभागून) → पूर्वी लोढा- द्वितीय वर्ष कला आणि तन्वी चंदवानी- द्वितीय वर्ष बी.एम.एस.

उत्तेजनार्थ पारितोषिक → अस्मिता जाधव - प्रथम वर्ष कला, ज्योती विश्वकर्मा - तृतीय वर्ष कला आणि विघ्नेश साळुंखे - द्वितीय वर्ष कला

स्पर्धा गट: शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी→

प्रथम पारितोषिक [विभागून]-- प्रा.दर्शना सावंत आणि श्री. राहुल कढणे

द्वितीय पारितोषिक (विभागून) → प्रा. दर्शना बांडे आणि प्रा. विभव गळदगेकर

तृतीय पारितोषिक→ डॉ. योगेश्वरी पाटील

या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी आपले पुस्तक परीक्षण सादर केले होते. या स्पर्धकांपैकी सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी खूप चांगल्या पद्धतीने पुस्तक परीक्षण केले. सर्वांचे प्रयत्न वाखाणण्याजोगी होते. सदर कार्यक्रमात एकूण १२ स्पर्धकांनी खूप चांगल्या पद्धतीने पुस्तक परीक्षण केले. या बक्षिसांची विभागणी आणि <u>पारितोषिक</u> प्राप्त

विजेत्यांना उपरोक्त स्पर्धेचे पारितोषिक वितरण दिनांक २६ जानेवारी-२०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले होते. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समाजरत्न डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर आणि इतर मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र, पुस्तक आणि पेन या स्वरूपात पारितोषिक वितरीत करण्यात आले होते.

















FORMALISM . ARTIST AND VISUAL




'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शेठ एन. के. टी. टी. महाविद्यालयाने उपरोक्त सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले. या सर्वच उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. सदर उपक्रमाचे आयोजन "वाचन संकल्प महाराष्ट्राचा संयोजन समिती" चे समन्वयक प्रा. गीतांजली चिपळूणकर यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे सदस्य सौ. दिपाली मुलमुले, श्री. शिशिर आंगणे, श्री. प्रणव भामरे आणि ग्रंथालय कर्मचारी श्री. मनोहर मरगजे, श्री. महादेव प्रभू, श्री. लक्ष्मण कोल्हे, श्री अशोक डाके, श्री. राहुल कढणे, श्री. शुभम शर्मा, सौ. श्यामल भांगले, श्री. जितेंद्र साळुंके यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचप्रमाणे सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी प्रत्येक उपक्रमात हिरारीने सहभागी होवून सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सदर उपक्रमाला महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

| श्री. राजेश लुळे | सौ. गीतांजली चिपळूणकर | डॉ. दिलीप पाटील |
|---|---|---|
| ग्रंथपाल | समिती समन्वयक | प्राचार्य |